# 1857 च्या उठावातील क्रांतिकारक जबलपूर चा राजा शंकर शहा

**मार्गदर्शक :-**
**Dr. Suresh N Kale**
Head of Department of History
Professor, Researcher and Guide
H. B. T. Arts And Commerce College
Tajabad Sharif Umred road, Nagpur 440024
Email id:- sureshkale1972@rediffmail.com

**लेखक :-**
**Dr. Kishor B. Agguwar**
H. O. D.
Rajarshi Shahu Art and Science jr. College
Pandharkawada District. Yavatmal 445302
Email id :- kishor.agguwar@gmail.com

---

**सारांश :-**

जबलपूर प्रदेशात गोंडवंशाचे गढा राज्य होते. त्याचा वारस राजा शंकरशाह व त्यांचा मुलगा रघुनाथशाह यांनी १८५७ च्या स्वातंत्र्यक्रांतीत इंग्रजांविरुद्ध उठावाचे नेतृत्व केले. इंग्रजांनी त्यांना अटक करून १८ सप्टेंबर १८५७ रोजी तोफेच्या तोंडी बांधून ठार केले. त्यांच्या बलिदानामुळे क्रांतीची ज्वाला अधिक भडकली.

**जबलपूर भागाची भौगोलिक पार्श्वभूमी :-**

मध्यप्रदेशातील इ. स. २०१० च्या प्रशासकीय रचनेनुसार जबलपूर भागामध्ये जबलपूर, कटनी, नरसिंहपूर, छिंदवाडा, सिवनी, मंडला आणि बालाघाट इत्यांदी जिल्ह्यांचा समावेश होतो. जबलपूरच्या पश्चिमेकडे नर्मदा घाट व उत्तरेकडे सोनघाट यांनी वेढलेला आहे. पूर्वेकडे बघेलखंडाचा पठारी प्रदेश तर दक्षिणेकडे मेकलचा पठारी प्रदेश पसरलेला आहे. या भागामध्ये नर्मदा नदी ही जबलपूरच्या मेकल पहाडी प्रदेशावरून पश्चिमेकडे पटांगणात वाहते. दक्षिण मध्यप्रदेशात पश्चिमी सिमेअगोदर सातपुडा पर्वतांच्या रांगा व मेकलचे पठार आहे. या रांगाच्या दक्षिण पूर्व भागाचे पाणी वैनगंगेमध्ये जाते.'

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

शंकरशाह हा गढा राज्याचा वारस होता. या राज्यात संग्रामशाह सारखा प्रतापी राजा आणि वीर राणी दुर्गावती होऊन गेली. इ. स. १७७६ मध्ये गढाराज्याचा शेवटचा यशस्वी शासक निजामशाहच्या मृत्यूनंतर त्याचे दोन पुत्र सुमेरशाह आणि नरहरिशाह मध्ये ओढाताण चालली होती. हे दोघेही सागर स्थित मराठ्यांकडून मदत घेत एक दुसऱ्यांचा पराभव करीत होते. सागरमध्ये तेव्हा पेशव्यांचा प्रतिनिधी विसाजी चांदोरकर हा होता. गढा राज्याच्या सिंहासनाच्या ओढाताणीचा शेवट सुमेरशाह आणि त्यांच्यानंतर नरहरिशाह यांचा पराभव करून कैद करण्यात आले.

अशाप्रकारे इ. स. १७८४ मध्ये गढा राज्यावर सागर येथील मराठ्यांचा अधिकार झाला. सुमेरशाहाला जटाशंकरच्या किल्ल्यात आणि नरहरिशाहाला खुरईच्या किल्ल्यामध्ये बंदिस्त ठेवल्या गेले होते. शंकरशाहा सुमेरशाहाचा मुलगा होता. गढा राज्याचा शेवट झाल्यानंतर त्यांच्या वारसांच्या जीवनचरितार्थासाठी काही जागीर दिल्या गेली. तसेच शंकरशाहाला जबलपूरच्या जवळ एक जागीर दिल्या गेली. शंकरशाहांच्या मुलाचे नाव रघुनाथशाह होते. राजा शंकरशाह गोंड-हा तीन गावांचा जागीरदार होता. त्यांच्यावर त्याचा जीवनचरितार्थ चालत होते. इ. स. १८५७ च्या क्रांतीच्या वेळी राजा शंकरशाहाचे वय ७० वर्ष पूर्ण झालेले होते आणि त्याच्या मुलाचे वय ४० वर्षाच्या जवळ होते. राजा शंकरशाहचा राजवाडा पूरवा (जबलपूरच्या जवळ गढा-पूरवा) मध्ये होता.

## १८५७ च्या उठावाच्या वेळेची राजकीय स्थिती :-

१८५७ ची क्रांती जेव्हा सुरू झाली तेव्हा गढा राज्याचा शेवट होऊन ७३ वर्ष होऊन गेले होते. पण त्याच्या वैभवाची आठवण आजही लोकांना होती. १५ वर्ष अगोदर इ. स. १८४२ मध्ये बुंदेला उठावाने लोकांना प्रोत्साहित केले. स्वतः शंकरशाहच्या मनामध्ये आपल्या गेलेल्या वंशाचे राज्य परत मिळविण्याची आकांक्षा दबलेली होती. जेव्हा इ. स. १८५७ मध्ये जबलपूरमध्ये क्रांती झाली तेव्हा शंकरशाहच्या इच्छा जागृत झाल्या. तो क्रांतीसाठी घडपड करू लागला. त्यांच्या जवळ तीन गावाची जागीर पुराव्यामध्ये होती आता ते जबलपूरचे उपनगर आहे. तिथे तो राहत होता. या दिवसामध्ये इतर क्रांतिकारकही त्यांचे मार्गदर्शन घेण्यासाठी त्यांच्या वाडयावर येणे-जाणे करू लागले. वस्तुतः असंतुष्ट भारतीय सैनिक आणि ठाकूर-जमीनदारांची गुप्त बैठक पूरवामध्ये शंकरशाहच्या नेतृत्वामध्ये संपन्न होत होती आणि विदेशी सत्तेला पराभूत करण्याची योजना इथे बनत होती. सप्टेंबरच्या सुरुवातीला काही सैनिक आणि ठाकूरांनी क्रांतीची योजना बनविली होती त्यांना शंकरशाहाचे नेतृत्व मिळाले होते." त्याला थांबविण्यासाठी जबलपूर येथे सेनेची गरज असल्याने स्टीवार्टच्या नेतृत्वात दक्खन सेना जबलपूरकडे येण्यास गव्हर्नर जनरल कॉउन्सीलकडून निर्देश मिळाले आहे असे सूचीत करतो.

## जबलपूरचा राजा शंकरशाह आणि रघुनाथ शहाची भूमिका :-

मेरठच्या क्रांतीची बातमी जबलपूरच्या ५२ व्या पलटणला मिळाली होती. त्यांनी इंग्रजांच्या विरोधात संघर्ष करण्याचा निर्णय घेतला. तसेच त्यांनी राजा शंकरशाह व त्यांचा मुलगा रघुनाथ शहाला पूर्णपणे सहकार्य करण्याचा निर्णय घेतला. ब्रिटिश अधिकाऱ्यांना आंता पूर्णपणे विश्वास झाला की, राजा शंकरशाह गोंड आणि त्यांचा मुलगा रघुनाथ शाह व इतर ठाकूर आणि जबलपूर मध्ये तैनात ५२ व्या भारतीय पलटनच्या काही सैनिकांसोबत ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध षडयंत्र रचल्या जात होते. लेफ्टनंट सी. बल्डवीनने लेफ्टनंट क्लार्कला दि. १९ सप्टेंबर १८५७ च्या पत्रात सूचित केले की, ५२ व्या रेजीमेंटच्या सैनिकांची हत्या करण्यात आलेली आहे ती फक्त अफवाह होती तसेच ट्रेझरीची सुरक्षा ५२ व्या रेजीमेंटचे यहुदीनराम ट्रेझरीची रक्षा केली. पोलिस येईपर्यंत तसेच त्याला सुरक्षित ठेवले होते. शंकर शाह आणि रघुनाथ शाह लोकांच्या दृष्टीने राजांसारखे होते. त्यामुळे त्यांच्या आदेशाने भारतीय सैनिक आणि ठाकूर जमीनदार आपल्या देशासाठी बलिदान देण्याची तयारी करीत होते. मुहर्रम च्या दिवसामध्ये एक विशेष योजनेच्या तयारीमध्ये क्रांतिकारक जोरात

होती. योजना अशी होती की, मोहरमच्या दिवशी इंग्रज छावणी (कॅन्टोनमेन्ट) वर आक्रमण करून इंग्रजांना बंदी बनवून तळाला आग लावल्या जावी आणि ब्रिटिश सरकारच्या खजिन्याला लुटण्यात यावे. परंतु या षडयंत्राची गुप्त बातमी विश्वासघाती गुप्तचर सैनिकाने इंग्रजांना दिली. त्यामुळे जबलपूरमध्ये ही जोरदार अफवा होती की, सहा लोकांच्या गटाने असा निर्णय घेतला. मुहर्रमच्या ताजिया उत्सवाच्या वेळी सैनिक आणि नोकरदार गैरहजर राहील तेव्हाच तळावर आणि लायन्सवर आक्रमण केल्या जाईल.' ही पूर्ण कार्यवाही इंग्रज डेप्यूटी कमिश्नर कॅप्टन क्लार्कला अगोदरच माहित होती. त्यामुळे मुहर्रम च्यावेळी ब्रिटिशांवर होणारे आक्रमण अयशस्वी झाले. या सर्व घटनेचा परिणाम म्हणजे केवळ इंग्रज सावध झाले नाही तर राजा शंकरशाहचा परिवार ब्रिटिशांचा सर्वात मोठा शत्रू झाला." सूचना मिळाल्यानंतर डेप्यूटी कमिश्नरने षडयंत्राची सत्य माहिती मिळविण्यासाठी फकीराच्या वेशात एका शिपायाला पाठविले आणि त्याची योजना यशस्वी झाली. कारण राजा आणि त्याचा मुलगा फकीराच्या वेशातील चपराश्याला ओळखू शकले नाही आणि त्यांनी निःसंकोचपणे आपली योजना पूर्ण करण्यासाठी अवलंबविण्यात येणाऱ्या सर्व गोष्टींची माहिती सांगितली. डेप्यूटी कमिश्नर कॅप्टन क्लार्क आपले सहायक २० स्वार आणि ४० सैनिकांसोबत दि. १४ सप्टेंबर १८५७ ला राजा शंकरशाहांच्या पूरवा स्थित गढीवर आक्रमण केले. जेव्हा ते त्या जागेपासून जवळपास एक मैल दूर होते तेव्हा डेप्यूटी कमिश्नर वेगाने काही स्वारासोबत समोर गेला आणि तोपर्यंत गावाला वेढून राहिला. जेव्हा पर्यंत पोलिसाने तिथे पोहचून राजा, त्याचा मुलगा रघुनाथ शाह आणि जवळपास १३ लोकांना घरामध्ये बंदी बनविल्या गेले नाही. यानंतर पुन्हा एकदा शंकरशाहच्या घरांची तपासणी केल्या गेली. ज्यामध्ये राजाने आपल्या सरदारांना लिहिलेली कागदपत्रे व इतर दस्ताऐवज मिळाले. ज्यामध्ये स्पष्टपणे म्हटल्या गेले की, त्यांना राजभक्त म्हणून इंग्रजांना नष्ट भ्रष्ट करण्यासाठी त्यांना एकत्रित राहण्याचा आदेश होता. या दस्ताऐवजामध्ये इंग्रजांच्या विरोधात क्रांतीला प्रोत्साहित करणारे साहित्य होते."

त्यामध्ये त्यांनी लिहिलेली प्रार्थना होती ज्यामध्ये देवीला विनंती केल्या गेली ती युरोपियांना नष्ट करावे ती प्रार्थना पुढील प्रमाणे होती.

*"मुंद मुख डंडिन को चुगलौ की चबाई खाई*

*खुद डौर दुष्टन को शत्रु-*

*संघारका मार अँगरेज रेज कर देइ मात*

*चंडी बचे नहिं बैरि-*

*बाल बच्चे संघरका संकर की रक्षा कर*

*दास प्रतिप्राल कर दीन की*

*सुन आयमाल हालका खायइ लै*

*मलैछन को झलै नाहि*

*करौ अब भक्षन कर ततछन घौर-*

*मत-कालिका " १२*

अशा कवितामुळे आणि इतर कागदपत्रामुळे राजा शंकरशाह व त्याचा मुलगा रघुनाथशाहांच्या इंग्रजा विरोधी कटकारस्थानाची माहिती झाली.

शंकरशाह, त्याचा मुलगा रघुनाथशाह आणि इतर बंदीस्त सैनिकांना कारागृहामध्ये बंदी बनवून ठेवल्या गेले. ही बातमी समजताच लोकांमध्ये क्रांतीची भावना भडकल्या गेली. दि. १५ जून १८५७ च्या एका घटनेने इंग्रजांना भयभीत केले होते. एक सैनिक जो झाशीतील घटनेने उत्साहित होता. त्याने इंग्रज अधिकाऱ्यावर बंदुकीने आक्रमण केले मात्र त्याला नियंत्रणात करून गार्डरुम मध्ये बंद केल्या गेले. तपासणी अंतर्गत त्याला पागल घोषित केल्या गेले. परंतु या घटनेने जबलपूरमधील युरोपियन लोकांमध्ये अत्यंत भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. क्रांती होण्याच्या भीतीने सर्व युरोपियन स्त्रिया, मुले कमिश्नरच्या घरी सुरक्षिततेच्या दृष्टिने ठेवल्या गेले. असंतुष्ट सैनिकांना क्रांतीसाठी भडकविण्याचे आणि शंकरशाह व इतरांना सोडविण्याच्या इतर प्रयत्नांना यशस्वी होऊ नये यासाठी लवकरच इंग्रजी सत्तांनी डेप्यूटी कमिश्नर आणि दोन अन्य इंग्रज अधिकाऱ्यांचे सैनिक न्याय आयोग बनविले. कमिटीने या दोघांना राष्ट्रद्रोहाचा अपराधी ठरविले आणि त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनविल्या गेली. दि. १८ सप्टेंबर १८५७ ला एजन्सीच्या समोर फाशी परेड झाली. एका मैदानावर आमंत्रित जन-समुदायासमोर पायदळ व घोडेस्वार सैनिक तुकडी सोबत शंकरशाह आणि रघुनाथ शाहला आणून हातकडी व साखळया सोडून त्यांना तोफांच्या तोंडावर बांधण्यात आले. आणि तोफ चालवून त्यांना सर्वांसमोर उडवून दिल्या गेले." राष्ट्रवीर शंकरशाह ची विधवा राणी. फूलकुंवर ने शवांच्या तुकडयांना एकत्रित करून त्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. राजा शंकर शाहांच्या जागीरमध्ये तीन गाव आणि रघुनाथ शाह जवळ १३४४ रुपये किंमतीची ९४७ वर्गगज जमीन होती. ही सर्व संपत्ती सरकारने जप्त केली. मात्र यामुळे क्रांतीची आग विझण्यापेक्षा अधिक भडकली. ५२ वी रेजिमेंट उभी झाली आणि शस्त्रास्त्र, गोळा-बारुद घेऊन शहराच्या बाहेर पाटनकडे कूच केले. पाटन आणि स्लीमनबाद स्थित सैनिक दळ सुद्धा ५२ व्या रेजिमेंटच्या क्रांतिकारकासोबत इंग्रज अधिकाऱ्यांविरुद्ध भडकले व त्यांनी हिरण नदीला पार केले व पंधरा मैल चालल्यानंतर ते नदीच्या डाव्या तटावर थांबले. याच जागेवर जबलपूरचा कमिश्नर सुद्धा कटंगीसाठी येत होता आणि येथूनच त्याला नदी ओलांडायची होती. या ठिकाणाला कठीण जागा मानल्या जात होती. या जागेच्या जवळपास जंगले आणि डोंगर होते. जिथे तोफा आणने-नेणे खूप कठीण जात होते. एकदा कटंगी तुकडीला नदी ओलांडतांना आपल्या गोळा-बारुद आणि खूप साऱ्या साहित्यापासून मुकावे लागले. त्यावेळी त्यांची-स्थिती खराब होती. खाण्यासाठी जेवण, राहण्यासाठी तंबू नव्हते. भांडे इ. सर्वच वाहून गेले होते. शेवटी कमिश्नर हताश झाला होता. दुसऱ्या बाजूला शंकरशाहांची विधवा फूलकुंवरनी इंग्रजांचा बदला घेण्याचा निश्चय केला आणि ती मंडला येथे आली. तिने सुद्धा देशी सैनिकांना गोंडवानामध्ये एकत्रित केले आणि इंग्रजांशी संघर्ष करून हुतात्मा झाली.

अशा प्रकारे तिनशे वर्षांपूर्वी आपल्या गोंडवंशाच्या राणी दुर्गावतीच्या पद चिन्हांवर चालून शेवटचा राजा शंकरशाह व रघुनाथ शाह यांनी सुद्धा देशासाठी हुतात्मा होण्याची परंपरा कायम ठेवली. ऑक्टोंबर १८५७ पर्यंत जबलपूरची स्थिती अशांत होती. या बाबतीत कॅप्टन वुड आपल्या ११ ऑक्टोबरच्या शासकीय पत्रामध्ये लिहितो की, शांतता स्थापन करण्यासाठी त्याने ७ ऑक्टोंबरला क्रांतिकारकांची धर-पकड करण्यासाठी एक तुकडी जबलपूरच्या जवळ पाठविली आहे. नोव्हेंबर १८५७ मध्ये जबलपूरच्या जवळ मद्रास पलटणने क्रांतिकारकांचा पराभव केला होता मात्र या संघर्षामध्ये कॅप्टन टोटनहम मारला गेला. त्याच महिन्याच्या एका लढाईत (असिस्टेंट क्वार्टर मास्टर जनरल नागपूर फोर्सच्या) मेजर जेन्किन्सला जीव गमवावा लागला." बहादूरसिंहने जबलपूर मधून रीवा राज्यामध्ये आश्रय घेतला व अहमद बख्श खुरईचा तहसिलदार होता. त्याने क्रांतीच्यावेळी अप्रत्यक्ष मदत केली कारण क्रांती सुरू असतांना तो मूकदर्शक होता. त्यामुळे ब्रिटिश सरकारने त्याला बंडखोर म्हणून त्याची घोषणा करून त्याला पकडण्यासाठी एक हजार रुपयाचे बक्षिस देण्याची घोषणा केली. तरीही तो सापडला नाही."

**संदर्भ :-**


1) कुमार प्रमीला, शर्मा श्रीकमल, 'मध्यप्रदेश एक भौगोलिक अध्ययन', मध्यप्रदेश हिन्दी ग्रंथ अकादमी २०१०, पृ. ३२५-३४९.

२) मिश्र सुरेश, श्रीवास्तव भगवानदास, 'स्वातंत्र्य समर -१८५७ मध्यप्रदेश के रणबांकुरे', स्वराज संस्थान सांस्कृतिक विभाग, भोपाल, पृ. २०१.

३) श्रीवास्तव भगवानदास, 'जंग-ए-आजादी में महाकौशल १८५७-६०', स्वराज्य संस्थान संचालनालय संस्कृती विभाग, मध्यप्रदेश शासन भोपाल, २००६ पृ. ३.

४) M.P.N.A. Case file no. 20/1858 (Revenue) जागीरावरून दूर केल्याचा अभिलेख p.37.

५) मिश्र द्वारका प्रसाद, 'मध्यप्रदेश में. स्वाधीनता आन्दोलन का इतिहास,' स्वराज संस्थान संचालनालय, मध्यप्रदेश शान २००२, पृ. ८५.

६) Jabalpur Division Bundle Correspondance Political Department case file no. 20 of 1857 pages 1-431 p.426

७) M.P.S.A. Bhopal of 1858 Jabalpur Mutiny. p. 10.

८) Jabalpur Division Bundle Correspondance Revenue Department case file no. 19 of 1857 pages 1-382 p.244.

९) श्रीवास्तव भगवानदास, 'जं.-ए-आ. में म. (१८५७-६०)' पृ.४.

१०) M.P.S.A. Bhopal Jablapur Division Bun. Corre. Pol. case file no 19, 1857 para 2-3. p. 246-247.

११) जबलपूर जिल्हा गॅजेटियर, पृ. ९४-९५०